# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४६७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २४/०६/२०१७

## १) गैरकायदयाची मंडळी जमवुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन अश्लिल शिवीगाळ करुन रेतीचे ट्रक जाळुन व पोलीस वाहनांच्या काचा फोडल्याने गुन्हा नोंद .:—

दिनांक २२/०६/२०१७ चे ११.४५ वा. दर. यातील कु. प्राची मोतीलाल मांडवकर वय १५ रा. मांगली हिचा अपघात होवुन मरण पावली या घटणेच्या विरोधात यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी तयार करुन पोलीसांना कामकाज करण्यास अटकाव करुन शासकीय कर्मचाऱ्याला ढकलढुकल करुन प्रथम तहसिलदाराला घटनास्थळी बोलवा नतंरच आम्ही कार्यवाही करुन देवुन असे म्हणुन महसुल विभागाला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तुम्ही रेती चोरी साठी सहकार्य करता व आमचा जिव जातो असे म्हणुन रेतीचे तीन ट्रक जाळुन ३० लाख रुपयाचे नुकसान केले तसेच पोलीस वाहनाच्या काचा फोडुन अंदाजे ३०,०००/—रु. चे नुकसान केले असे सरतर्फे फिर्यादी पोना. गजभिये यांचे व डॉक्टरी रिपोर्ट वरुन आणि जिल्हाधीकारी सा. भंडारा यांचे कलम ३७(१)(३) मपोका चे उल्लंघन केल्याने पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५३,२९४,१४३,१४७,१४८,१४९,४३५,४२७ भांदवि. सहकलम ४ सार्व मालमत्ता नुकसान प्रति. कायदा सहकलम क्रिमीनल लॉ अमेंडमेन्ट ॲक्ट सहकलम १३५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. ताजने पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

## २) मोटार पंपाची चोरी .:—

**अ)** दिनांक २१/०६/२०१७ चे १८.३० वा. ते २२/०६/२०१७ चे ०८.३० वा. दर. यातील फिर्यादी धनराज टिकाराम चौधरी वय ६२ वर्ष, रा. आमगाव यांचे नवीन घराचे बांधकामा करीता पाण्याच्या टाकीवर लावलेली मोटार पंप जुनी १ एचपीची विद्युत मोटार पंप किंमती २५००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चेके पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**ब)** दिनांक २१/०६/२०१७ चे १७.०० ते २२/०६/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी मोडकु सावजी मेश्राम वय ९० वर्ष, रा. लव्हारी/ उमरी यांचे शेतावरील विहीरीवर पाणी देण्याकरीता लावण्यात आलेली एक काळया रंगाची लुबी कंपनीची दीड हॉस पावर मोटार पंप किंमती ३,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

## ३) संगनमत करुन एमएसईबी कार्यालयाचे थकीत बिलाचे मागणी केली असता भांडण व शिवीगाळ करुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद .:—

दिनांक २२/०६/२०१७ चे २१.०० वा. दर. यातील फिर्यादी प्रणय प्रमोद बंन्सोड वय २५ वर्ष, रा. निलज विद्युत सहाय्यक म.रा.वि.वी पवनी जखमी हा एमएसईबी कार्यालय येथे नोकरीवर हजर असतांना त्यास एमएसईबी कार्यालयाकडुन लोकांचे थकीत बिल वसुली करण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. त्यामुळे आरोपीतांनकडे थकीत बिलाचे फिर्यादीने मागणी केली असता यातील आरोपीतांनी संगनमताने फिर्यादीला तुमचे थकीत बिलाचे पैसे भरायचे नाही असे म्हणुन भांडण करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केले व शिवीगाळ करुन फिर्यादी हा सरकारी काम करीत असतांना त्यास दुखापत केल्याने फिर्यादी यांचे लेखी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५३,३३२,१८६,५०४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. डहाके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) शेतावरील खात फेकण्याच्या कारणावरुन वाईट शिवीगाळ करुन मारण्यापिटण्याची धमकी देवुन लांबाझोबी करुन हाताच्या भुजेला व नाकाला चावा घेतल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २३/०६/२०१७ चे ०७.०० वा . दर. यातील फिर्यादी विनोद निलकंठ ठाकरे वय ३० वर्ष, रा. विरली/ खु. हा आपले वडीलासह शेतावर हजर असतांना आरोपी हा फिर्यादीचे शेतावरील खात फेकु लागला असता त्याला फिर्यादीचे वडीलाने हटकले असता आरोपीने वाईट शिवीगाळ करुन मारण्यापिटण्याची धमकी दिली व फिर्यादी सोबत लांबाझोंबी होवुन आरोपीने डाव्या हाताच्या भुजेला व नाकाला चावा घेतल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भलावी पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**५) पैश्याच्या वादावरुन धारदार चाकुसारख्या वस्तुने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २३/०६/२०१७ चे १०.३० वा . दर. यातील फिर्यादी विकास चिंतामन भुरे वय ४२ वर्ष, रा. हनुमान नगर तुमसर हा जि. प. हायस्कुल सिहोरा येथील कार्यालयात बसला असता कनीष्ठ लिपीक आरोपी याने फिर्यादीस प्रवासाकरीता २०/—रु. दे. म्हणुन भांडण करुन धारदार चाकुसारख्या वस्तुने उजवे पायाचे मांडीवर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लिल्हारे पो.स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**६) सामाईक रिश्तदार यांची सम्मती न घेता जमीनीची मोजणी करुन खोटी सहया करुन शासनाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २७/०२/२०१७ पासुन. यातील आलेसुर येथील गट क्र. ७३/०१ चे सातबारावर यातील फिर्यादी व आरोपी यांचे सामुहीक नावे रेकार्डला नोंद करुन आरोपीने ०.३ भार जमीनीचे मोजणी करीता सामाईक रिश्तेदार फिर्यादी यांचे सम्मती न घेता मोजणी अर्जाचे कामी परिशीष्ट अ मध्ये अर्जदाराचे नावा समोर त्यांचे नावाची स्वत:ची खोटी सही करुन मोजणी सम्मती दर्शवुन मा. तालुका निरीक्षक भुमी अभिलेख तुमसर येथे सादर करुन जमीनीची मोजणी करुन मोजणीचा सहपत्र अहवाल प्राप्त करुन घेतल्याचे याबाबत अर्जदारने दिलेल्या अर्जाचे चौकशीत आरोपीने फिर्यादीची व शासनाची फसवणुक केल्याचे आढळुन आल्याने चौकशी अहवाला वरुन सरतर्फे फिर्यादी सफौ. मोदनकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ४२०,४६८ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

७) अवैध दारु अडयावर धाडी . :–

दिनांक २३/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, वरठी, तुमसर, लाखनी व अडयाळ येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारु, किंमती २६००/–रु. व १० लिटर २६० किंमती २९६४/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

८) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २३/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १६३ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०३ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १४५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

सपोनी. अे.टी. सुनगार
नियंत्रण कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र ९८२३१२३३३६

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.